महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१२१६/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १९ ऑक्टोबर, २०१८.

प्रस्तावना :- एलोरा मेडीकल्स ॲन्ड एज्युकेशनल फौंडेशन,पुणे संचलित आर्यन्स वर्ल्ड स्कूल,वारजे,ता.हवेली,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत एलोरा मेडीकल्स ॲन्ड एज्युकेशनल फौंडेशन,पुणे संचलित आर्यन्स वर्ल्ड स्कूल,वारजे,ता.हवेली,जि.पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस ( इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई), सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा स्थापन करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती-

१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसा सी.बी.एस.ई मंडळाशी संलग्नते करिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर

कनिष्ठ लिपीक
आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग

शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे <u>बंधनकारक</u> राहील.

४)संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

६) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "<u>स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा</u>" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वाक्षरी) १९/१०/२०१८

(रा.वि.कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे,
६. शिक्षणाधिकारी जि.प. (प्राथमिक / माध्यमिक), पुणे,
७. निवडनस्ती (एसएम-२).

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ 71AA 717684

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी
मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.
अनु. क्र. ३६३२४ दि. ७/१०/२३ मु.शु. रक्कम १००/-
दस्ताचा प्रकार प्र. पत्र - शैक्षणिक
दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.
मिळकतीचे वर्णन
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव आर्यन वर्ल्ड स्कूल
पत्ता वारजे पुणे
दुसऱ्या पक्षकाराचे नाव
हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता [illegible]
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

सौ. मंगल अरुण नवले
स्टॅम्प व्हेंडर
परवाना क्र. 2201101
[illegible]

वरिष्ठ कोषागार अधिकारी
27 SEP 2023
प्रथम मुद्रांक लिपिक
कोषागार पुणे कार्यालय

प्रति,
मा. शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे.

विषय:- महाराष्ट्र शासन नविन शाळा मान्यता आदेश दि:- १९-१०-२०१८ च्या मान्यतेच्या झेरॉक्स प्रतबाबत खुलासा.

आ. महोदय,

उपरोक्त विषयानुसार एलोरा मेडिलकल्स अँड एज्युकेशनल फाउंडेशन संचालित आर्यन्स वर्ल्ड स्कूल, वारजे पुणे या शाळेस स्वयंअर्थ सहाय्यित तत्वावर संस्थेस शाळा मान्यता क्रमांक :- शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१८/प्र. क्र. 1216/एसएम-२ दि १८-१०-२०१८ रोजी देण्यात आला होता.

P.T.O.

तसेच त्याची मुळ प्रत संस्थेस प्राप्त झाली किंवा नाही. ही सज्ञान होत नाही किंवा आमच्याकडे सापडत नाही.

सदर महाराष्ट्र शासना चा शासन निर्णय झेरॉक्स स्वमान्यता करता उपलोड करत आहोत. त्यालाच सत्य प्रत मानावे तसेच संस्थेने सत्य प्रतिबाबत मंत्रालय मुंबई येथे संपर्क साधलेला आहे. तेथील काम होतास आपल्या समोर समक्ष आणून देण्यात येईल.

वरील माहिती व अपलोड केलेला शासन निर्णय आदेश हा सत्य असून आपणास दिलेली माहिती खरी आहे. माहिती मध्ये कोणताही दोष आदळून आल्यास संस्था व शाळा जबाबदार असेल व आपणास कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार असेल.

ठिकाण :- पुणे

दिनांक :- 16/10/2023

हमीपत्र लिहून देणार

ELLORA MEDICALS & EDUCATION FOUNDATION ★ PUNE

मिलिंद लडगे

(अध्यक्ष)

एलोरा मेडिकल्स अँड एज्युकेशनल फौंडेशन,

कात्रज, पुणे.